# -: प्रशसंनीय अहवाल :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **पोलीस ठाणे** | **:-** | **ताडदेव पोलीस ठाणे, मुंबई** |
| २ | **गु.र.क्र. व कलम** | **:-** | ३९९/२०२४ कलम ३१८(४) भारतीय न्याय संहीता |
| ३ | **फसवणूक केलेली तसेच परत मिळवलेली मालमत्ता** | **:-** | रक्कम रु १०,६५,०००/-<br>**(पाहिजे आरोपीचे एच डी एफ सी बॅकेचे खाते क्रं. 50200021350012 या बॅक खात्यामधुन LIEN MARK करण्यात आलेली होती , सदरची रक्कम हि मा.न्यायालयाचे आदेशान्वये फिर्यादी यांचे बॅक खात्यात जमा करण्यात आली आहे)** |
| ४ | **दि. ११/१२/२०२४ रोजी बी एन एस एस कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे.** | **:-** | श्री. अबेनेझर सॅमेडविन, पत्ताः- वेरिटास्टेक पायलट अकादमी, पत्ता :- नं.५, ४ था स्किम, आयसीएफ कॉलनी, अयनामपक्क रोड, अंबत्तूर, चेन्नई ६०००५८ |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशी की, :-** नमुद गुन्हयातील फिर्यादी नामे श्री. तेजस सुनिल सावंत, वय- ३५ वर्षे यांनी दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक २८/०८/२०२४ रोजी पर्यंत वेरिस्टास्टेक पायलट अकादमी चे मालक श्री. सॅमेडविन यांचेकडे कॅनडा एव्हिएशन अकादमी येथे विमान पायलटच्या पुढील व्यावसायिक प्रशिक्षणाला जाण्यासाठी पहिला हप्ता म्हणुन आर.टी.जी.एस द्वारे रक्कम रुपये २०,००,०००/- पाठविले होते. सदर रकमेपैकी आरोपी वेरिस्टास्टेक पायलट अकादमी चे मालक श्री. सॅमेडविन यांनी रु. ९,३५,०००/- कॅनडा एव्हिएशन अकादमी येथे पाठवुन उर्वरीत रक्कम रु १०,६५,०००/- कॅनडा एव्हिएशन अकादमी येथे न पाठवता किंवा फिर्यादी यांना परत न करता स्वतःच्या आर्थिक फायदया करीता सदरची रक्कम वापरुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली, म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरुन मा. वरिष्ठांकडे टिप्पनी अहवाल सादर करुन, मा. वरिष्ठांच्या लेखी परवानगीने फिर्यादी यांचा दि. २९/१०/२०२४ रोजी पुन्हा सविस्तर जबाब नोंद करुन, ताडदेव पोलीस ठाणे गु.र.क्र. ३९९/२०२४ कलम ३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**गुन्हयाचा तपास :-**

गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे श्री. अबेनेझर सॅमेडविन, पत्ताः- वेरिटास्टेक पायलट अकादमी, पत्ता :- नं.५, ४ था स्किम, आयसीएफ कॉलनी, अयनामपक्क रोड, अंबत्तूर, चेन्नई ६०००५८ याचा गुन्हयाच्या अनुषंगाणे शोध घेण्याकामी मा. वरिष्ठांच्या लेखी आदेशान्वये चेन्नई येथील स्थानिक टी/२ अंबत्तुर इस्टेट या स्थानिक पोलीस ठाण्याकडुन पोलीस मदत घेवुन, पाहिजे आरापीचे नमुद रहाते पत्त्यावर जावुन शोध घेतला असता आरोपी घरी मिळून आला. त्याचेकडे दाखल गुन्हायाचे अनुषंगाने चौकशी केली असता, त्याचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्यामुळे गुन्हयाचे अन्वेषणाच्या संबधात त्याच्याकडुन तथ्थे व परिस्थीती जाणुन घेण्यासाठी प्रश्न करण्यासाठी वाजवी कारणे आहेत. परंतु नमुद गुन्हयात ०७ वर्षापेक्षा कमी शिक्षा असल्याने मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार योग्य त्या अटीशर्तीवर पाहिजे आरोपीतास बी एन एस एस कलम ३५ (३) अन्वये नोटीस बजावण्यात आली होती.

गुन्हयातील आरोपी सॅमेडविन याने नमुद गुन्हयाचे फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केलेल्या रक्कमेतील रुपये १०,६५,०००/- हि फिर्यादी यांनी नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीचे एच डी एफ सी बॅकेचे खाते क्रं. **50200021350012**, IFSC कोड HDFC0001765 शाखा मोगप्पैर वेस्ट शाखा,चेन्नई या बॅकेच्या शाखेत आर टी जी एस मार्फतीने ट्रान्सफर केले असल्याने, सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने नमुद रु. १०,६५००० /- (अक्षरी रुपये दहा लाख पासष्ट हजार मात्र) ही नमुद बॅक खात्यामधुन LEAN MARK करण्यासाठी मा. मॅनेजर सो., एच डी एफ सी बॅक ताडदेव शाखा, मुंबई यांना जावक क्रमांक ९९०३/२०२४, दिनांक ३०/१०/२०२४ अन्वये पत्र व्यवहार करण्यात आला होता. सदर पत्र व्यवहाराच्या अनुषंगाने नमुद बॅक खात्यातुन फिर्यादी यांची फसवणूक केलेली रक्कम रुपये १०,६५०००/- (अक्षरी रुपये दहा लाख पासष्ट हजार मात्र) ही LEAN MARK करण्यात आलेली होती. सदर रक्कम ही LEAN MARK केलेबाबत मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी सो., सुट्टीचे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई यांना जावक क्रमांक ९९२१/२०२४, दिनांक ३१/१०/२०२४ अन्वये लेखी पत्र देवुन, माहिती दिली असता, मा. न्यायालयाने सदरबाबत दखल घेतलेली होती.

मा. न्यायालयाच्या आदेशान्वये गुन्हयातील आरोपीच्या बॅक खात्यात संबधीत बॅक अधिकारी यांच्या मार्फतीने लिन मार्क केलेली वर नमुद रक्कम हि फिर्यादी यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. नमुद आरोपीतां विरुध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे.